## आवाहन

- मागील अंकात नमूद केल्याप्रमाणे, आपल्या पुणे शाखेच्या वतीने आठवी राज्यस्तरीय आंतर-महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा दि. ३० सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ६ या वेळेत ''वेदशास्त्रोत्तेजक सभागृह'' (सारस बागेजवळ) येथे आयोजित करण्यात आलेली आहे. आणि त्यात गणेशोत्सवाची धामधूम संपलेली असल्याने, सर्वांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेस उपस्थित राहावे.
- याबरोबरच पुणे शाखेच्या वतीने ८ सप्टेंबर रोजी सद्गुरू स्वामी शिवानंद सरस्वती यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त सायंकाळी डॉ.आनंद राव यांच्या घरी विशेष सत्संगाचे आयोजन करण्यात आलेले आहे.
- आपल्या शाखेचे दोन सदस्य, ऋषिकेश येथील ८ सप्टेंबरच्या सोहोळ्यास उपस्थित राहणार आहेत.

## Feel the Presence of God

1. I may hide from mortal man but I cannot hide anything from the Lord. Therefore, I must do nothing unworthy in His Presence. This is created in the seeker who feels the Presence of God always.
2. God is everywhere - this feeling is a wonderful method of progressing in your attempt to commune with God and ultimately become one with Him.
3. Start the day with God. End the day with God. Fill the day with God. Live the day with God.

**- Swami Chidananda**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- 'दिव्य जीवन' या मासिक पत्रिकेचा ऑगस्ट अंक सदस्यांना, वाचकांना आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पाठविण्यात आला.
- ऑगस्ट महिन्याचा सत्संग, श्री. गोपाळराव नगरकर यांच्या घरी दि. १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी संपन्न झाला.

**पुणे शाखेचा पत्ता**

**श्री. गो. आ. नगरकर**
'स्वानंद' एस्. २०
सहजीवन सोसायटी
पर्वती, पुणे ४११००९
☎ ९३७०५७०२०६

**श्री. नितीन देशपांडे**
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९ /सायंतारा,
डि. एस. के. विश्व
धायरी, पुणे ४११०४१
☎ ०९८५०९३१४१७
०९८५०८२६९९०

पुस्त-डाक

प्रति,



# दिव्य जीवन



स्वामी शिवानंद सरस्वती



स्वामी चिदानंद सरस्वती

(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)
वर्ष ७ । अंक ९
सप्टेंबर २०१२

## बालकांसारखं अंत:करण

असं अंत:करण जसं बालकाचं मन ! देवाला ना हवं तुमचं वैभव, ना हवी तुमची बुद्धी, त्याला हवं तुमचं अंत:करण !

खरेपणानं सजलेलं ! वंचना, उथळपणा आणि ढोंग यांचा मागमूस नसलेलं ! त्याच्यापासून लपविता येण्यासारखं काही नाहीच. तसा तो सर्वज्ञानी, सर्वव्यापी आत्मा आहे. अगदी हिमासारखं निर्मल आणि स्फटिकासारखं शुभ्र तुमचं अंत:करण हवं.

धुळीनं भरलेल्या आरशात तुम्हाला तुमचं प्रतिबिंब दिसत नाही. तसंच तुमचं अंत:करण मलिन असेल, स्वार्थाच्या कोळिष्टकांनी भरलेलं असेल, ढोंग आणि कपट यांनी ते खराब झालं असेल तर देवाचं खरं स्वरूप तुम्हाला कदापि कळणार नाही. म्हणूनच साधकानं जोपासावं असं अंत:करण जसं काही निरागस बालकाचं मन !

**- स्वामी शिवानंद**

## महिन्याचा विचार

शिवानंद परिवारासाठी २०१२ हे वर्ष 'खास' आहे. श्री. स्वामी शिवानंदजी महाराज यांची १२५ वी जयंती ८ सप्टेंबर २०१२ रोजी आहे. ''मानवतेची सेवा ही सर्वोच्च कोटीतील ईश्वरसेवा असते'' हा संदेश देणाऱ्या सद्गुरुंची, नि:स्वार्थ सेवेचे प्रतीक असलेल्या आपल्या कुटुंब प्रमुखाची या निमित्ताने आठवण होणे स्वाभाविक आहे. सदासर्वदा शिष्यांसाठी, संन्याशांसाठी, सर्वसामान्यांसाठी एक विलोभनीय आणि अनुकरणीय प्रतीक बनलेल्या महामानवाची ही जयंती मोठ्या उत्साहात, भव्य प्रमाणात साजरी करण्याचे दिव्य जीवन संघाच्या, हृषिकेश येथील आश्रमाने ठरविले आहे. या निमित्ताने काही उपक्रम आयोजित केलेले आहेत, ज्यायोगे सद्गुरुंच्या अंत:करणाला संतोष मिळेल. सद्गुरूंच्या चरणी श्रद्धासुमने अर्पित करण्यासाठी आश्रमाद्वारे काही पावले आधीच उचलली गेली आहेत. त्यापैकी काही उपक्रम, सर्वांच्या माहितीसाठी मुद्दाम इंग्रजीतून येथे देत आहोत -

1. **Books :** Five books have been released on different auspicious occassions during the year and seven books are under publication.
2. **Free Literature :** For students of schools and colleges, teachings and messages of Gurudev are being printed in English and Hindi for free distribution.



3. **Endowments :** Endowments, study Centre and scholarship Programmes in Universities across the Country have been institution alized.
4. **School Building :** The Headquarters Ashram has provided Rupees Fifty Lakhs for the construction of a new school building at Laxamjhula. This will be named as "Swami Sivananda Memorial Government Inter College.
5. **Scholarships :** For local students and those in neighbouring regions.
6. **Yoga Certificate Course :** One month additional Yoga Certificate Course for youth.
7. **Audio Lessions :** Yoga Vedanta Forest Academy lectures have been uploaded on the Websites.
8. **Swami Sivananda- Chitra Katha :** Life story originally in English, is being printed and published in major Indian languages.
9. **Student's Camps :** Sprirituals Camps for children and youth are being organized at the Headquarters Ashram.
10. **Dramas on Gurudev's Life :** Various DLS branches have written dramas on Gurudev's Life.

या व्यतिरिक्त खालील अतिरिक्त कार्यक्रम योजले आहेत -



1. **Spirituals Camp for students** A three day Camp for students, schools and Colleges of Rishikesh.
2. **Sastra Parayan** (September 2-5,2012)
3. **Spiritual Conference** (September 6-8, 2012)

या पवित्र प्रसंगी सद्गुरुंच्या पावनचरणी आपण सर्वांनी पुन्हा एकदा श्रद्धापूर्वक माथा टेकवावा आणि मानवतेच्या नि:स्वार्थ सेवेत झोकून द्यावे. सद्गुरू स्मरणाचा आणि त्यांचे आशीर्वाद मिळविण्याचा यापरता दुसरा अधिक चांगला मार्ग नाही.

## Guru-Parampara

Spiritual knowldege is a matter of Guru-parampara. It is handed down from Guru to disciple. Gaudapadacharya imparted Self-knowledge to his disciple Govindacharya, Govindacharya t0 his disciple Sankaracharya; Sankaracharya to his disciple Suresvaracharya. Matsyendranath imparted knowledge to his disciple Gorakhnath; Gorakhnath to Nivrittinath; Nivrittinath to Jnanadeva. Totapuri imparted knowldge to Sri Ramakrishna and Ramakrishna to Swami Vivekananda. It was Ashtavakra who moulded the life of Raja Janaka. It was Gorakhnath who shaped the spiritual destiny of Raja Bhartrihari. It was Lord Krishna who made Arjuna and Uddhava get themselves established in the spiritual path when their minds were in an unsettled state.

**- Swami Sivananda**